Inward No. 76
Date 22/01/2021

महाराष्ट्र शासन
आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
DIRECTORATE OF AYUSH, MAHARASHTRA STATE, MUMBAI.
शासकीय दंत महाविद्यालय आणि रुग्णालय इमारत, चौथा मजला, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार,
पी. डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
4th Floor, Government Dental Collage & Hospital Building, St George Compound, D' mello Road, Mumbai - 01.
कार्यालय - दुरध्वनी व फॅक्स - ०२२-२२६२१००७ संचालक : ०२२-२२६२२२४७
ई-मेल : directorayurvedmaha@gmail.com वेबसाईट : www.mahayush.gov.in

जा.क्र.आसंमुं/NEET UG-२०२०/SEBC-EWS/२०२०/आयु-२ दिनांक :- 21 JAN 2021

अत्यंत महत्वाचे

प्रति,
मा.आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी,
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई

विषय : **सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास ( एसईबीसी ) वर्गातील घटकांना खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया घटकांचा लाभ देण्याबाबत.**

संदर्भ : शासनपत्र क्र.संकीर्ण-०१२१/प्र.क्र.१०/समन्वय, दि.१८-१-२०२१

महोदय,

शासनाने शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक २३-१२-२०२० अन्वये "सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास ( एसईबीसी )" वर्गातील उमेदवारांना सन २०२०-२१ या वर्षातील शैक्षणिक प्रवेश घेण्यासाठी "आर्थिकदृष्टया दुर्बल घटकाचे" प्रमाणपत्र देण्यास मान्यता दिली आहे (सोबत प्रत जोडली आहे). त्याअनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत शासनाने संदर्भित पत्रान्वये सूचित केले आहे. सोबत संदर्भित पत्र व सहपत्राची प्रत जोडली आहे.

यास्तव, प्रकरणी, शासनाने संदर्भित पत्रान्वये दिलेल्या निर्देशाचे अनुषंगाने आपणास विनंती करण्यात येते की, संबंधित विद्यार्थी व महाविद्यालये यांचे माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव संदर्भित पत्र व सहपत्र आपले संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे व त्यानुसार जे उमेदवार सदर प्रमाणपत्राची पूर्तता करतील अशा एसईबीसी उमेदवारांना ईडब्लूएस आरक्षणाचा लाभ अनुज्ञेय करण्याबाबत संबंधित महाविद्यालयांना सूचित करण्यात यावे.

Forwarded to Addmission
22/01/2021

आपला,
( वैद्य कुलदीप राज कोहली )
संचालक आयुष,
आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत - उपसचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग ( शिक्षण-२), नवीन मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.

NEETUG 2020

Scanned with CamScanner

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय,मुंबई ४०० ०३२

क्रमांक: राआधो ४०१९/प्र.क्र.३१ /१६-अ दिनांक: ८ जानेवारी, २०२१

प्रति,
अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
सर्व विभाग
मंत्रालय, मुंबई ४०००३२

**विषय : सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (एसईबीसी) वर्गातील घटकांना खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांचा लाभ देण्याबाबत...**

सामान्य प्रशासन विभाग , शासन निर्णय राआधो ४०१९/प्र.क्र.३१/ १६ अ, दि.२३.१२.२०२० अन्वये सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (एसईबीसी) वर्गातील उमेदवारांना सन २०२०-२१ या वर्षातील शैक्षणिक प्रवेश घेण्यासाठी व सरळसेवा भरतीकरीता आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांचे प्रमाणपत्र देण्यास मान्यता देण्यात आली आहे. तथापि, सदर शासन निर्णयाचे अंमलबजावणी होत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे. सदर शासन निर्णयानुसार जे उमेदवार सदर प्रमाणपत्राची पूर्तता करतील अशा एसईबीसी उमेदवारांना ईडब्ल्यूएस आरक्षणाचा लाभ अनुज्ञेय करण्यात यावा.

तसेच याबाबत आपल्या अखत्यारीतील सर्व शासकीय, निमशासकीय सेवा, मंडळे/महामंडळे, नगरपालिका/महानगरपालिका, जिल्हापरिषदा, शासकीय विद्यालय, शासकीय संस्था, खासगी विद्यालय, महाविद्यालय, अनुदानित/विना अनुदानित विद्यालय, महाविद्यालय व शैक्षणिक संस्था यांना आवश्यक कार्यवाही करण्याबाबतचे निर्देश आपल्यास्तरावरुन तात्काळ देण्यात यावेत.

मुख्य सचिव
महाराष्ट्र शासन

Scanned with CamScanner

# महाराष्ट्र शासन

तात्काळ
ईमेल : medd.coordination@gov.in

क्र.: संकीर्ण ०१२१/प्र.क्र. १०/समन्वय.
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार,
नवीन मंत्रालय, मुंबई - ४०० ००१.
दिनांक :- १८/०१/२०२१.

प्रति,
१) अवर सचिव (वैसेवा १, वैसेवा २, शिक्षण १, शिक्षण २)
कक्ष अधिकारी (वैसेवा ३, वैसेवा ४, औषधे १, आयु १, आयु २, प्रशासन १, परिचर्या),
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, मुंबई.
३) व्यवस्थापकीय संचालक, हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ (मर्यादित), मुंबई.
४) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
५) संचालक, आयुष संचालनालय, मुंबई.
६) संचालक, महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था, पुणे.
७) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
८) संचालक, हाफकिन प्रशिक्षण, संशोधन व चाचणी संस्था, मुंबई.

**विषय** :- सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (एसईबीसी) वर्गातील घटकांना खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांचा लाभ देण्याबाबत.

**संदर्भ** :- सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि.८/०१/२०२१.

महोदय/महोदया,

मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या संदर्भाधिन पत्राची प्रत सोबत जोडलेली आहे. त्याचे कृपया अवलोकन व्हावे.

सदर पत्राद्वारे मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी सामान्य प्रशासन विभाग शासननिर्णय राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि.२३/१२/२०२० अन्वये सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (एसईबीसी) वर्गातील उमेदवारां… सन २०२०-२१ या वर्षातील शैक्षणिक प्रवेश घेण्यासाठी व सरळ सेवा भरतीकरिता आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांचे प्रमाणपत्र देण्यास मान्यता दिली असतांना सदर शासननिर्णयाची अंमलबजावणी होत नसल्याची बाब निर्देशनास आणून दिली आहे. सदर शासननिर्णयानुसार जे उमेदवार सदर प्रमाणपत्राची पुर्तता करतील अशा एसईबीसी उमेदवारांना ईडब्ल्यूएस आरक्षणाचा लाभ अनुज्ञेय करावा, असे निर्देश मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी दिले आहे.

तरी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या निर्देशानुसार योग्य ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी, ही विनंती.

आपला,
१८|०१|२१
( सं. बा. डेरे )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

Email Sent to all
१८|०१ सोबत-वरीलप्रमाणे

D:\SHRIKANT\2020\...

Scanned with CamScanner

सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गातील घटकांना खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचा लाभ देण्याबाबत.....

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
**शासन निर्णय क्रमांक : राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - २३ डिसेंबर, २०२०

**वाचा:-** १. शासन निर्णय क्रमांक राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि. १२ फेब्रुवारी, २०१९
२. शासन पत्र क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि. २० मार्च, २०१९
३. शासन पत्र क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि. २६ एप्रिल, २०१९
४. शासन पत्र क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि. ६ सप्टेंबर, २०१९
५. सा.प्र.वि., परिपत्रक क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि. २८जुलै, २०२०
६. सा.प्र.वि. शासन निर्णय क्र. बीसीसी २०२०/प्र.क्र.२९५/१६ व, दि.९ ऑक्टोबर २०२०
७. सा.प्र.वि., शासन निर्णय क्र. बीसीसी २०२०/प्र.क्र.२९५/१६ व, दि.२४ नोव्हेंबर २०२०

**प्रस्तावना :-**

संसदेने संविधानात १०३ व्या घटनादुरूस्तीनुसार आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेशासाठी व शासन सेवेतील नियुक्त्यांमध्ये १० टक्के आरक्षण विहित केलेले आहे. त्यानुसार राज्य शासनाने संदर्भ क्र.१ अन्वये खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेशासाठी व शासन सेवेतील नियुक्त्यांमध्ये १० टक्के जागा आरक्षित केल्या आहेत. सदर आरक्षणाच्या लाभासाठी ज्या घटकांना कोणत्याही मागास प्रवर्गातील आरक्षणाचा लाभ दिला जात नाही, अशा खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचा समावेश करण्यात आला आहे.

२. राज्यातील शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेशासाठी व शासन सेवेतील नियुक्त्यांमध्ये राज्यात सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) या वर्गास आरक्षण देण्यात आलेले असल्याने या वर्गास आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी अनुज्ञेय असलेले १० टक्के आरक्षण लागू होत नाही. तथापि, केंद्र शासनाच्या मागास प्रवर्गाच्या यादीमध्ये मराठा समाजाचा समावेश नसल्याने केंद्र शासनाच्या अखत्यारीतील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाच्या जागा व सेवेतील भरतीसाठी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या आरक्षणाकरीता महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्ग पात्र आहे. यासंदर्भात, शासनाने संदर्भ क्र.२ ते ५ अन्वये, रोजीच्या पत्रान्वये आवश्यक सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

३. मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुज्ञा याचिका क्र.१५७३७/२०१९ व इतर याचिकांदरील दि.०९.०९.२०२० रोजीच्या सुनावणीत एसईबीसी आरक्षणास अंतरीम स्थगिती दिली आहे.

Scanned with CamScanner

२. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे (ईडब्ल्युएस) प्रमाणपत्र देण्याच्या कार्यवाहीस्तव संबंधित सक्षम प्राधिकारी सर्व विभागीय आयुक्त/ जिल्हाधिकारी/सर्व निवासी उप जिल्हाधिकारी/सर्व तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांनी विशेष मोहिम राबवून संबंधित विद्यार्थ्यांना प्रवेशप्रक्रियेपूर्वी प्रमाणपत्र उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी. याकरीता विशेष कक्षाची स्थापना करुन विद्यार्थ्यांना प्रवेशाच्या दृष्टीने प्रमाणपत्र प्राथम्याने देण्यासाठी आवश्यक कार्यवाही तातडीने करावी.

३. सदर प्रमाणपत्र निर्गमित करताना, सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (एसईबीसी) वर्गातील उमेदवारांना मागील आर्थिक वर्षाच्या उत्पन्न व मत्ता या आधारे राज्य शासनाने विहित केलेले निकषाप्रमाणे विहित प्रपत्रातील " <u>महाराष्ट्र राज्य सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गाकरीता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अधिनियम २०१८ (सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६२</u> )" **हा अधोरेखित भाग वगळून** आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे (ईडब्ल्युएस) प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही संबंधित सक्षम प्राधिकारी यांनी करावी.

४. तसेच केंद्र शासनाच्या सेवा व शैक्षणिक प्रवेशासाठी केंद्र शासनाने आर्थिकदृष्टया दुर्बल घटक आरक्षणासाठी संदर्भ क्र.२ मध्ये नमूद केल्यानुसार विहित निकष व विहीत विवरणपत्रात स्वतंत्र प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही संबंधित सक्षम प्राधिकारी यांनी करावी.

५. सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागासप्रवर्गातील उमेदवारांना खुल्या प्रवर्गात अथवा ईडब्ल्यूएस आरक्षणातून लाभ घेणे ऐच्छिक असेल.

६. उमेदवाराने शैक्षणिक प्रवेशातील अथवा शासन सेवेत भरतीकरीत ईडब्ल्यूएस आरक्षणाचा लाभ घेतल्यास सदर उमेदवार एसईबीसी आरक्षणाच्या लाभास पात्र ठरणार नाही.

७. सदरचे आदेश हे मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.१५७३७/२०१९ व इतर याचिकांमधील अंतरीम आदेशावरील निर्णयाच्या अथवा अंतिम निर्णयाच्या अधीन राहतील.

८. हा शासन निर्णय शासकीय/ निमशासकीय सेवा, मंडळे/महामंडळे, नगरपालिका / महानगरपालिका, जिल्हा परिषदा, शासकीय विद्यालय, महाविद्यालय, शासकीय शैक्षणिक संस्था, खाजगी विद्यालय, महाविद्यालय, शैक्षणिक संस्था, अनुदानित/विना अनुदानित विद्यालय, महाविद्यालय व शैक्षणिक संस्था आणि ज्यांना मार्गदर्शक आदेश देण्याचा अधिकार राज्य शासनाला आहे, अशी इतर सर्व प्राधिकरणे, सेवा व संस्था यांना लागू राहील. संबंधित यंत्रणांनी याबाबत आवश्यक त्या सूचना निर्गमित कराव्यात.


Scanned with CamScanner

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २०२०१२२३१६३४५४६८०७ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

TIKARAM WAMAN KARPATE

(टि.वा.करपते)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा. विरोधीपक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा/ विधानपरिषद,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
२. मा. सर्व सन्माननिय विधानसभा/ विधानपरिषद,व संसद सदस्य महाराष्ट्र राज्य
३. मा. राज्यपालांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबारहिल ,मुंबई.
४. मा. मुख्यमंत्र्यांचे अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान परिषद) विधानभवन, मुंबई.
६. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान सभा) विधानभवन, मुंबई.
७. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव.
८. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१, मुंबई,
९. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-२, नागपूर,
१०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
११. प्रबंधक, मा.उच्च न्यायालय, मुळ न्याय शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१२. प्रबंधक, मा.उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१३. प्रबंधक, मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१४. प्रबंधक, मा. लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई.
१५. सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी/सर्व विभागीय जिल्हाधिकारी/उप विभागीय अधिकारी (प्रांत अधिकारी)/ सर्व तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार, महाराष्ट्र राज्य .
१६. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.महाराष्ट्र राज्य ,
१७. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१८. उप सचिव ,(आस्थापना शाखा) सर्व मंत्रालयीन विभाग ,मंत्रालय ,मुंबई.
१९. सर्व मंत्री ,राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/मंत्रालय ,मुंबई.
२०. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय ,मुंबई.
२१. सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
२२. सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई.
२३. सरकारी वकील, उच्च न्यायालय, मुळ शाखा व अपील शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर,
२४. सरकारी वकील, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर,


Scanned with CamScanner

मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या अंतरीम स्थगिती आदेशान्वये शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रवेश हे एसईबीसी अधिनियमातील आरक्षणाशिवाय करण्यात यावे. तसेच शासन सेवेतील पदावरील नियुक्त्या सुध्दा अधिनियमातील आरक्षणाशिवाय करण्याबाबत आदेश आहेत. मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेली अंतरीम स्थगिती उठविण्यासाठी मा.सर्वोच्च न्यायालयात मोठ्या खंडपीठाकडे शासनाच्या वतीने विनंती अर्ज दाखल करण्यात आला आहे. तथापि, अद्याप सदर प्रकरणी न्यायनिर्णय प्रलंबित आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या अंतरीम स्थगिती आदेशामुळे संदर्भ क्र. ७ अन्वये सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील दि.९.९.२०२० रोजीनंतरच्या शैक्षणिक प्रवेशांना एसईबीसी आरक्षण न ठेवता पार पाडण्याबाबत तसेच दि.९.९.२०२० पूर्वी प्रवेशासाठी अर्ज केले असतील व प्रवेश देण्यात आले नसतील तर अशा एसईबीसी घटकातील विद्यार्थ्यांना खुल्या प्रवर्गातून प्रवेश देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र. ९५९३४/२०२०, ९८०६६/२०२०, ९८३०९/२०२०, ९७७५७/२०२०, ९८३००/२०२० तसेच मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका क्र. ७४५५/२०२०, याचिका क्र.७८७६/२०२०, ८०७२/२०२०, ८०८४/२०२०, ८०९४/२०२० २१८१२/२०२०, २२३४७/२०२०, २२४२५/२०२०, ८०७२/२०२०, ८०८४/२०२०, ८०९४/२०२० दाखल करण्यात आलेल्या आहेत. काही याचिकांमध्ये अंतिम निकाल देण्यात आलेला असून एसईबीसी उमेदवारांना ईडब्ल्यूएस प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश देण्यात आलेले आहेत. याचिका क्रमांक ९८०६६/२०२० मध्ये दिनांक ८.१.२०२० पूर्वी एसईबीसी उमेदवारांना ईडब्ल्यूएसचे प्रमाणपत्र देण्याबाबत मा.उच्च न्यायालय मुंबई येथे शपथपत्र दाखल करावयाचे आहे. तसेच याचिका क्रमांक ८०७२/२०२० , ८०८४/२०२०, ८०९५/२०२० मध्ये न्यायालयाने "It would have been appropriate if the Government would have taken a decision as to whether the benefit of EWS ought to be granted to the candidates, who have applied from SEBC category and the said reservation is stayed by the Apex Court. It appears that the decision to that effect has not been taken" असे निरिक्षण नोंदविले आहे. सदर बाब विचारात घेता, सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गातील उमेदवार राज्यात खुल्या प्रवर्गातून प्रवेशाकरीता पात्र असल्याने या वर्गास मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रवेश व सरळसेवा भरतीसाठी खुल्या प्रवर्गातील ईडब्ल्यूएस आरक्षणाचा लाभ देण्यासाठी ईडब्ल्यूएस प्रमाणपत्र देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :**

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ९.९.२०२० रोजीच्या अंतरिम स्थगिती आदेश विचारात घेता, सद्य:स्थितीत सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (एसईबीसी) वर्गातील उमेदवारांना सन २०२०-२१ या वर्षातील शैक्षणिक प्रवेश घेण्यासाठी व सरळसेवा भरतीकरीता आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे (ईडब्ल्युएस) प्रमाणपत्र देण्यास मान्यता देत आहे.



Scanned with CamScanner